स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

कला विद्याशाखांतर्गत मराठी विषयातील पीएच्.डी. पदवीसाठी सादर

केल्या जाणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा

प्रबंधाचा विषय

"उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातील सामाजिक जाणिवांचा अभ्यास"

संशोधक विद्यार्थी

प्रा. माधव गोविंदराव सूर्यवंशी

श्री एम.एम. पिप्युल्स ओन स्कूल ॲन्ड ज्यु.कॉलेज

एस.व्ही. रोड, खार (पश्चिम), मुंबई-५६

मार्गदर्शक

प्रा.डॉ.राजकुमार खंडू मस्के

विभागप्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर-४१३५१७

जि.लातूर

मार्च २०१६

“उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातील सामाजिक जाणिवांचा अभ्यास”

प्रस्तावना

उत्तम कांबळे हे संपादक, पत्रकार आणि साहित्यिक म्हणून महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. माणूस आणि जीवन याविषयी त्यांना निखळ आस्था आहे. माणसे आणि पुस्तके एकाच वेळी वाचणारा डोळस दृष्टीचा सुहृदयी लेखक आहे. त्यांच्या साहित्यावर चार्वाक, संत कबीर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव आहे.

समाजातील विविध पातळ्यांवर होणारा संघर्ष यांचे नाते त्यांच्या लेखनाशी आहे. व्यवस्थेने कितीही हतबल करुन मारावे म्हटले तरी त्यांच्या साहित्यातील माणसे न मरणारी आहेत. जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडलेले जग, किमान गरजांसाठी सुरू असलेला जीवघेणा संघर्ष असा विश्वव्यापी मोठा पट, त्यांचे साहित्य वाचताना आपल्या डोळयासमोरुन सरकत जातो. वास्तवाचे भान राखून वर्तमानकाळाशी सजग राहून भविष्याचे वेध घेणारे त्यांचे लेखन आहे. त्यांच्या साहित्याची बांधिलकी समाज वास्तवाशी आहे. समाजवास्तवाला साकार करीत माणूसपण शोधण्याचा प्रयत्न त्यांनी साहित्यातून केला आहे. हे माणूसपण शोधत शोधतच त्यांचे साहित्य गतिशील होत जाते हे विशेष आहे. लेखक समाजाच्या समतावादी पुनर्रचनेची आशा बाळगून आहे. याच नवनिर्मितीची स्पंदने त्यांच्या साहित्यात सतत जाणवत राहतात.

विषय निवडीचे महत्त्व :

उत्तम कांबळे हे नव्या पिढीतील ताकदीचे लेखक आहेत. ते नुसतेच लेखक नाहीत तर परिवर्तनाच्या चळवळीत काम करणारे कार्यकर्ते आहेत. त्यांचा पिंड जरी पत्रकारितेचा असला तरी त्यांचे मन मात्र संवेदनशील आहे. या संवेदनशील मनाने

जीवनातील अनेक वेगवेगळया संदर्भात आपली लेखणी, कथा, कादंबरी, कविता, स्फुट लेखन, ललित लेखन लिहून झिजविले आहे.

उत्तम कांबळे यांनी वेगवेगळया विषयावर कथालेखन केले आहे. मराठी कथासाहित्यात जागतिकीकरण, महानगरीय, देवदासी या विषयावर अपेक्षित तितके लेखन झाले नाही. यांचे कथासाहित्य पारंपरिक कथाविषयाला छेद परिवर्तनाचा चेहरा बनून पुढे येतो आहे. त्यांच्या कथेने निश्चितच मराठी कथासाहित्यात वेगळे स्थान निर्माण केले आहे. इतर दलित कथाकारांपेक्षा त्यांची कथा कशी वेगळी आहे, त्यांनी वेगवेगळे प्रश्न आणि समस्या कशा रीतीने हाताळल्या आहेत हे जाणून घ्यावे म्हणून “उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातील सामाजिक जाणिवांचा अभ्यास” हा अभ्यासविषयक निवडला आहे.

उद्दिष्ट्ये :

१) उत्तम कांबळे यांच्या वाङ्मयीन कार्यकर्तृत्वाचा शोध घेणे.

२) उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्य लेखनाच्या प्रयोजनाचा शोध घेणे.

३) उत्तम कांबळे यांच्या कथालेखनामागील प्रेरणा, प्रभावांचा शोध घेणे.

४) उत्तम कांबळे यांचा साहित्यविषयक दृष्टिकोन अभ्यासणे.

५) उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातील सामाजिक जीवनजाणीवांचा शोध घेणे.

६) उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातील सामर्थ्य आणि मर्यादांचा शोध घेणे.

७) उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यात विविध समस्या, प्रश्न कसे चित्रित झाले आहेत याचा शोध घेणे.

८) उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यावर महानगरीय जीवनाचा, जागतिकीकरणाचा परिणाम अभ्यासणे.

९) उत्तम कांबळे यांचे मराठी कथा साहित्यातील वेगळेपण शोधणे.

१०) उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातील वाङ्मय गुणांचा शोध घेणे.

गृहितके

१) उत्तम कांबळे हे सजग पत्रकार आणि परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते आहेत.

२) उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यावर महानगरीय जीवनाचा, जागतिकीकरणाचा परिणाम झालेला दिसून येतो.

३) उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्य वाङ्मय गुणांनी नटलेले आहे.

४) उत्तम कांबळे यांनी कथासाहित्यातून चेहरा नसलेल्या सामान्य माणसाचे चित्रण केले आहे.

५) उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातून सामाजिक जीवनजाणिवा चित्रित झालेल्या आहेत.

६) उत्तम कांबळे यांचे कथासाहित्य उपेक्षित, भटक्या विमुक्त लोकजीवनाचे अंतरंग उलगडते.

संशोधन पद्धती :

"उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातील सामाजिक जाणिवांचा अभ्यास" या विषयावर संशोधन करीत असताना संशोधनाच्या विविध पद्धतीचा आधार घ्यावा लागणार आहे. विविध दृष्टिकोनातून त्यांच्या साहित्याचे संशोधन करावे लागणार आहे. या साहित्याचे संशोधन करीत असताना चरित्रात्मक, ऐतिहासिक, सामाजिक, अधिबंधात्मक, मानसशास्त्रीय, आस्वादात्मक, आंबेडकरवादी, सौंदर्यवादी या समीक्षा पद्धतीचा आधार घेऊन उत्तम कांबळे यांच्या कथावाङ्मयाचे संशोधन करावयाचे ठरविले आहे. या संशोधनासाठी साधने म्हणून लेखकानी लिहिलेल्या कथासंग्रहाचा सूक्ष्म पद्धतीने अभ्यास करावा लागणार आहे. त्यांच्या कथासाहित्यावर लिहिली गेलेली समीक्षा, त्यांची भाषणे, संपादकीय लेखन, मुलाखती या संदर्भ साधनांच्या आधारे संशोधन करावयाचे ठरविले आहे.

व्याप्ती :

उत्तम कांबळे यांनी कथालेखक म्हणून मराठी साहित्यात वेगळे स्थान निर्माण केले आहेत. त्यांचे एकूण ०७ कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. तर आगामी काळात 'फिरस्ती' या वास्तवाशी निगडित असणाऱ्या कथासंग्रहाचा भाग येणार आहे. त्यांच्या कथासाहित्यातील सामाजिक जीवनजाणिवांचा शोध घ्यावयाचा आहे. यात दलित आणि सवर्ण संघर्ष, अस्पृश्यता, रुढी परंपरा, चालीरिती, अज्ञान, अंधश्रद्धा यांचा शोध घ्यावयाचा आहे. जागतिकीकरणाचा आशय असलेल्या कथेतून भांडवलदारी व्यवस्था दिवसेंदिवस कशी मानवी मूल्यांचा ऱ्हास करीत आहेत, माणसाचे शारीरिक, मानसिक, आर्थिक, धार्मिक, सामाजिक शोषण कसे केले जात आहे याचा अभ्यास ही प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती म्हणता येईल.

मर्यादा :

उत्तम कांबळे हे नव्या पिढीतील अनेक साहित्यप्रकार लिहित असलेले लेखक आहेत. त्यांनी केलेले लिखाण वैविध्यपूर्ण आहे. मराठी साहित्यातील कादंबरी, वैचारिक लेखन, ललित, स्फुटलेखन, आत्मचरित्र इत्यादी वाङ्मयप्रकार त्यांनी लिहिलेले असले तरी त्यांच्या कथा साहित्यातील सामाजिक जाणिवांचा चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे हीच संशोधनाची मर्यादा आहे.

प्रकरण मांडणी

प्रकरण पहिले - मराठी कथा : संकल्पना आणि स्वरूप

सदरील प्रकरणामध्ये कथा म्हणजे काय?, कथेचे प्रकार, कथेचे स्वरूप, कथेचे घटक, कथेचे विशेष, मराठी कथेचा उद्‌गम, विकास आणि वाटचाल या अनुषंगाने या प्रकरणाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - उत्तम कांबळे : व्यक्तित्व आणि कृर्तत्व

या प्रकरणात संशोधन विषयाचे लेखक उत्तम कांबळे यांचा जीवनपट आणि कार्य उलगडून दाखविण्यात येणार आहे. त्यांचा जन्म, बालपण, संस्कार, तत्कालीन परिस्थिती, शिक्षण, जडणघडण, प्रेरणा आणि प्रभाव, व्यावसायिक जीवन, वाङ्मयीन

कार्य, सामाजिक कार्य, माध्यम क्षेत्रातील त्यांचे योगदान इ. घटकांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण तिसरे - उत्तम कांबळे यांच्या कथेचे स्वरूप

उत्तम कांबळे यांनी जे कथासंग्रह लिहिलेले आहेत. त्या कथासंग्रहाचे पृथ्थकरण करून त्यांच्या कथांचे स्वरूप या प्रकरणात उलगडून दाखविण्यात येणार आहे. त्यांच्या वर्गसमूहाच्या कथा, स्त्री जाणिवेच्या कथा, ग्रामीण जाणिवेच्या कथा, दलित जाणिवेच्या कथा, जागतिकीकरणाचा परिणाम दाखविणाऱ्या कथा, महानगरीय जीवनाची गुंतागुंत व त्याचे दर्शन घडविणाऱ्या कथा, राजकीय जीवनजाणीवेच्या कथा, विज्ञानवादी कथा इत्यादी कथेचे स्वरूप या प्रकरणात अभ्यासण्यात येईल.

प्रकरण चौथे - उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातील सामाजिक जाणिवांचे स्वरूप

प्रस्तुत संशोधनाच्या या चौथ्या प्रकरणात उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातील सामाजिक जाणिवांचे स्वरूप असून या प्रकरणात उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातील अव्यक्त समाजाबद्दलच्या सामाजिक जाणिवा, जागतिकीकरणाबद्दलच्या सामाजिक जाणिवा, स्त्रियांबद्दलच्या सामाजिक जाणिवा, भूतदयेबद्दलच्या सामाजिक जाणिवा, राजकारणाबद्दलच्या सामाजिक जाणिवा या सामाजिक जाणिवांचे स्वरूप अभ्यासण्यात येईल.

प्रकरण पाचवे - उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्याचे वाङ्मयीन विशेष

उपरोक्त प्रकरणात उत्तम कांबळे यांच्या कथासाहित्यातील वाङ्मयीन विशेषांचा शोध घ्यावयाचा आहे. कथेतील कथानक, संवाद, व्यक्तिरेखा, निवेदनशैली, भाषाशैली, कथेतील प्रतिके आणि प्रतिमा यांचा वापर, लोकसंस्कृतीचे दर्शन, त्यात लोकरुढी, लोकविश्वास, लोकसमजुती, लोकम्हणी, वाकप्रचार, अलंकार, रसपरिपोष, नाट्यात्मकता या विविध वाङ्मयीन विशेषांचा शोध या प्रकरणात घेवून उत्तम कांबळेंच्या कथेचे मराठी साहित्यातील वेगळेपण आणि त्यांच्या कथेच्या मर्यादा विशद करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे - निष्कर्षात्मक विवेचन

प्रस्तुत प्रकरणात अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत. शेवटी संदर्भ ग्रंथांची आणि परिशिष्टांची यादी जोडली जाईल.

मार्गदर्शक
प्रा.डॉ.राजकुमार खंडू मस्के
विभागप्रमुख,
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर -४१३५१७ जि.लातूर

संशोधक विद्यार्थी
प्रा.माधव गोविंदराव सूर्यवंशी
श्री एम.एम. पिप्युल्स ओन
एस.व्ही. रोड, खार (पश्चिम),
मुंबई-५६